**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**माहिती व जनसंपर्क विभाग**

**प्रसिद्धीपत्रक**

- **मिरा भाईंदर शहरात "घर घर संविधान" उपक्रम सूरू**
- **या उपक्रमातंर्गत उत्तन चौक परिसरात शालेय विद्यार्थ्यांचे "हॅरीटेज वॉक"**

भारतीय संविधान अमृत महोत्सव २०२४-२५ निमित्त महाराष्ट्र शासनामार्फत संपूर्ण शहरात "घर घर संविधान" मोहिम राबविण्याचे निर्देश प्राप्त झाले. त्या निर्देशान्वये मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. राधाबिनोद अ. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली आज गूरूवार दि. १७.०४.२०२५ रोजी सकाळी उत्तन येथे उत्तन चौक ते चिमाजी अप्पा स्मारक परिसरात उत्तन शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सहभागात "हॅरीटेज वॉक" करण्यात आले.

"घर घर संविधान" अंतर्गत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून सोमवार, दि. १४.०४.२०२५ ते दि. २१.०४.२०२५ पर्यंत संविधान सप्ताह साजरा करण्याच्या अनुषंगाने अनेक उपक्रम राबविले. त्यापैकी एक उपक्रम म्हणजेच "हॅरीटेज वॉक". सदर उपक्रमाची सूरूवात बुधवार, दि. १६.०४.२०२५ पासून करण्यात आली. बुधवार, दि. १६.०४.२०२५ रोजी आयोजित केलेल्या हॅरीटेज वॉकमध्ये घोडबंदर किल्ल्याला भेट देऊन त्या वास्तूविषयी असलेला समृद्ध इतिहास शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले. आज गूरूवार, दि. १७.०४.२०२५ रोजी आयोजित केलेल्या हॅरीटेज वॉकमध्ये चिमाजी अप्पा स्मारकाची व त्या ऐतिहासिक वास्तूचे अभ्यासपूर्ण माहिती शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दिली. या हॅरेटीज वॉकच्या शेवटी उपस्थितांनी भारतीय संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले.

भारतीय संविधानाच्या मूल्यांची त्याच बरोबर देशाच्या, राज्याच्या व शहराच्या वैभवशाली इतिहासाची व ऐतिहासिक वास्तूंची जाणीव उभरत्या पिढीला करून देणे हा या मागील मुख्य हेतू आहे. संविधानाविषयी व त्यातील मूल्यांविषयी शहरातील नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने "घर घर संविधान" हा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाचा पुढील भाग म्हणून दि. २१.०४.२०२५ रोजी माशाचा पाडा, काशिगाव येथील आदिवासी पाड्यामध्ये हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

आजच्या या उपक्रमात उपायुक्त (मु.) श्रीम. कल्पिता पिंपळे, उत्तन सागरी पोलिस चौकीच वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. शिवाजी नाईक, मनपाचे सहा. आयुक्त, पोलिस उपनिरिक्षक श्री. विजय सावंत, उद्यान अधिक्षक व मनपाचे इतर अधिकारी/कर्मचारी/शिक्षक व विद्यार्थी सहभागी होते.